# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६  हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१०   फॅकस ०२२ २२०१८५३९ E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे मा. अध्यक्ष यांच्या शासकीय वाहनावर बाह्ययंत्रणेद्वारा वाहनचालक ( संख्या-१) नियुक्त करण्याकरीता वाहनचालक पुरविणा-या नोंदणीकृत संस्थाकडून लिफाफेबंद दरपत्रके/निविदा मागविण्यात येत आहेत.

बाह्ययंत्रणेद्वारा मनुष्यबळ/वाहनचालक पुरविणा-या संस्थाकरीता दरपत्रके सादर करणेसाठी सविस्तर तपशिल आवश्यक अटी व शर्ती इ. विषयक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्दिचा दिनांक | वृत्तपत्रात जाहिरा प्रसिद्ध करण्यात आलेली तारीख |
| २. | दरपत्रके/निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | वरील तारखेपासून १५ दिवस कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ३. | सील बंद लिफाफे उघडण्याचा दिनांक | अनु. क्र. २ वरील दिनांकाच्या दुस-या दिवशी  किंवा राज्य आयोग कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे . |

**अ. बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ ( वाहनचालक) पुरविणा-या संस्थांसाठी अटी व शर्ती.**

१. सदरची संस्था हि खालीलपैकी एका कायद्यांतर्गत व नोंदणीकृत असावी.

- मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम
- भागीदारी संस्था अधिनियम
- सहकारी संस्था अधिनियम
- कंपनी अधिनियम

२. सदरच्या संस्थेबरोबर एक वर्षाच्या कालावधीकरीता करार केला जाईल. तसेच वाहनचालकाच्या पदावर कार्यालयाकडून नियमित नियुक्ती करण्यात आल्यावर सदरचा करार संपुष्टात येईल.

३. सदरची सेवा केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतीही पुर्वसूचना न देता संस्थेबरोबर करण्यात आलेला करार समाप्त करण्यात येईल,

४. बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणा-या वाहनचालकांना मासिक परिश्रामिक अदा केल्याचा पुरावा संबधित संस्थेस या कार्यालयास प्रत्येक महिन्यात सादर करावे लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल.

५. संस्थेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणारा वाहन चालक हा विहीत परवानाधारक, प्रशिक्षित व अनुभवी असावा तसेच वयाची १८ वर्षे पुर्ण केलेला असावा.  तसेच सदरच्या वाहन चालकाविरुध्द कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल नसावेत व त्याबाबतच्या आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या प्रती व प्रतिज्ञापत्र संबंधित संस्थेने सादर करावेत,

६. संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात येणा-या वाहनचालकास भौगोलिक ( मुंबई शहर/उपनगर व बाहेरील जवळपासच्या जिल्ह्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

७. अपवादात्मक परिस्थिती वगळता वाहन चालक वेळोवेळी बदलण्यात येऊ नये. एकच वाहन चालक उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच बदली वाहन चालकाबाबत या कार्यालयास आगाऊ कळविण्यात यावे. तसेच वाहनचालक वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. वाहनचालक रजेवर असल्यास पर्यायी वाहनचालक पुरविणे संस्थेस बंधनकारक राहिल.

८. संस्थेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणा-या वाहन चालकाकडे संस्थेचे अधिकृत ओळखपत्र असावे

९. सदरच्या वाहन चालकाद्वारे वाहनाची देखभाल करण्यात यावी व सदरील वाहन सुस्थितीत राहील याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी व त्याबाबत संबंधितांने या कार्यालयास वेळोवेळी अवगत करावे,

१०. सदर वाहनावरील वाहन चालक हा शासकीय कामकाजाचे दिवशी, कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी तसेच मा.अध्यक्षांचे आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सदरच्या संस्थेची राहील व याप्रकरणी कोणतीही दिरंगाई, गैरसोय, इ. होणार नाही, याबाबत संबंधित संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच मा. अध्यक्ष राज्य आयोग यांच्या मुंबईबाहेरील दौ-याकरीता देखील वाहनचालक उपलब्ध करून देणे आवश्यक राहिल.

११. सदर संस्थेतर्फे उपलब्ध करुन देण्यात येणा-या वाहन चालकाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर किंवा शासनावर राहणार नाही,

१२. वरील सेवा पुरविल्याबाबतचा नियमानुसार व करारात मान्य केल्याप्रमाणे मोबदला दरमहा संबंधित संस्थेस प्रदान करण्यात येईल. याबाबत सदर संस्थेने दरमहा देयक सादर करावे. दरमहा अदा होणा-या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डाची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक राहिल.

१३. सदरील वाहन चालकास प्रदान करण्यात येणारे वेतन, भत्ते, भविष्य निर्वाह निधी, अपघात विमा व इतर सेवाविषयक बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहिल. त्याची जबाबदारी / उत्तरदायित्व शासनाकडून व / किंवा या कार्यालयाकडून घेण्यात येणार नाही.

१४. संबंधित वाहन चालकाचे सेवेबाबत कोणतेही न्यायिक व इतर वाद उद्भवल्यास त्यास हे कार्यालय व / किंवा शासन जबाबदार राहणार नाही. सदरची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची असेल.

१५. संबंधित वाहन चालक या कार्यालयाचे वाहनावर कार्यरत असतांना पोलीसांद्वारे अपघाताची नोंद करण्यात आल्यास त्याप्रकरणी पोलीस व न्यायालयाद्वारे करण्यात येणा-या कारवाईबाबत

कार्यवाही करण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहील. याबाबत या कार्यालयाकडून व / किंवा शासनाकडून कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

१६. संबंधित वाहन चालकाच्या चुकीमुळे शासकीय वाहनाचे नुकसान झाल्यास सदरच्या नुकसानाची भरपाई करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तसेच दुर्देवाने वाहनचालकास गंभीर स्वरूपात इजा झाल्यास त्याच्या वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसानभारपाईचे कोणतेही उत्तर दायित्व हे या कार्यालयाकडे राहणार नाही. त्याची पुर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

१७. कोणतीही निविदा/दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा एखादी अथवा सर्वच निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क राज्य आयोग कार्यालयाचा राहिल.

<u>ब. वाहनचालक उमेदवारांसाठी अटी व शर्ती</u>

१. वाहनचालकाकडे प्रादेशिक परिवहन अधिकारी , यांनी जारी केलेला विहित परवाना (Driving License) असणे आवश्यक आहे.

२. वाहनचालकास वाहन चालविण्याचा किमान २ वर्षाचा अनुभव असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र.

३. वाहनचालक किमान १० वी उत्तीर्ण असावा.

४. वाहनचालकाचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

५. वाहनचालकास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी.

६. वाहनचालक निर्व्यसनी असावा.

७. वाहनचालकास वाहनदुरूस्तीची प्राथमिक माहिती असावी.

sd/-
( स. ज्ञा. पवार )
प्र.प्रबंधक प्रशासन
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र मुंबई.